**प्रेसनोट        ता. ११/११/२०२४**

# करमणुक केंद्राचे नावाखाली जुगार अड्डा चालविणारे ३१ जणांवर जुगार कायद्यांतर्गत कारवाई एकुण १८ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत

दि.११/११/२०२४ रोजी मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो. चिंचवड पोलीस ठाणे यांनी पोलीस ठाणे हद्दित कोंबींग ऑपरेशन दरम्यान पाहीजे, फरारी, सराईत गुन्हेगार तपासणी व अवैद्य धंद्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे आदेश दिल्याने तपास पथकातील अधिकारी व अंमलदार असे पोलीस ठाणे हद्दित वेताळनगर झोपडपट्टी, चिंचवड पुणे कोंबींग ऑपरेशन करीत असतांना गुप्त बातमीदारामार्फत माहीती प्राप्त झाली की, आधार बहुउद्देशीय संस्था, ओम कॉलनी नंबर-०१, बिजली नगर, चिंचवड, पुणे याच्याकडे करमणुकीचा केंद्राचा परवाना आहे परंतु त्या ठिकाणी काही लोक एकत्र जमुन पत्यांचा पैशावर जुगार खेळत असल्याची माहिती मिळाली, लागलीच वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, जितेंद्र कोळी यांनी विभागिय रात्रगस्तीत असणारे सहा. पोलीस आयुक्त सो, श्री. मुकूटलाल पाटील यांना कळविली. मा. सहा. पोलीस आयुक्त सो, चिंचवड विभाग, पिं-चिं यांनी सदर बातमीची खात्री करुन कारवाई करण्याची परवानगी दिली. त्यानंतर मिळाले बातमीप्रमाणे आधार बहुउद्देशीय संस्था, ओम कॉलनी नंबर-०१, बिजली नगर, चिंचवड, पुणे येथे छापा टाकला असता, छाप्यात एकुण ३० इसम मिळुन आले, त्यातील २१ इसम हे स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी आपआपसात तीन पत्यांचा पैशावर जुगार खेळताना मिळुन आले व सदर आधार बहुउद्देशीय संस्थेचे परवाना धारक व त्यांचे इतर कामगार १० यांनी करमणुक परवानाचा भंग करुन स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी तीन पत्ती जुगार खेळण्याकरीता जागा उपलब्ध करुन दिली आहे. म्हणुन एकुण ३१ इसमांविरुध्द महाराष्ट्र जुगार अधिनीयम १८८७ चे कलम ४, ५, १२(अ) प्रमाणे गुन्हा नोंद करुन घटनास्थळावरुन, जुगाराची साधने, वस्तु, मोबाईल, वाहने, असे मिळुन **एकुण १८,०६,८६०/- रु.** किं.चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस आयुक्त सो. श्री. विनयकुमार चौबे, मा. सह पोलीस आयुक्त सो. श्री. शशीकांत महावरकर, मा. अप्पर पोलीस आयुक्त सो. श्री. वसंत परदेशी, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप-आयुक्त सो. परिमंडळ-१ श्रीमती स्वप्ना गोरे, सहा. पोलीस आयुक्त, चिंचवड विभाग, श्री. मुकुट पाटील, चिंचवड पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र कोळी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. दिपक गोसावी, पोउनि श्री. अजित दुधे, पोउनि श्री. जाधव, पोहवा श्री. गेंगजे, पोहवा-आमरे, पोहवा-सोनपेटे, पोहवा, नलगे, पोशि मोहिते, पोशि शेख, पोशि पिंजरकर, पोशि वानखेडे व पोशि फरांदे यांनी केलेली आहे.

( स्वप्ना गोरे )
पोलीस उप-आयुक्त
परिमंडळ-१, पिंपरी चिंचवड